# HGH INDIA® 2022

HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE

**July 12-15, 2022**

INDIA EXPO CENTRE, GREATER NOIDA, DELHI NCR

# NEWS 3

A TEXZONE Event

www.hghindia.com

Where business feels at home!


एचजीएच इंडिया २०२२

# बिझनेससाठी सज्ज

वेगाने वाढणाऱ्या भारतीय गृहोपयोगी उत्पादनांच्या बाजारपेठेच्या माध्यमातून प्रदर्शकांशी जोडून घेण्याच्या दृष्टीने विकसित करण्यात आलेली एचजीएच इंडिया २०२२ ही, या आंतरराष्ट्रीय ट्रेड शोची अकरावी आवत्तृी, भारतभरातील ५०० शहरे व गावांमधून येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतासाठी सज्ज आहे. एचजीएच इंडियाने होम टेक्स्टाइल्स, फर्निशिंग फॅब्रिक्स, होम फर्निचर, होम डेकोर, हाउसवेअर व गिफ्ट्स या विभागांवर लक्ष केंद्रित केले आहे. गेल्या वर्षी उत्तर भारतातील ग्रेटर नोएडामध्ये यशस्वी पदार्पण केल्यानंतर, एचजीएच इंडिया आता पुन्हा एकदा व्यवसायासाठी सज्ज आहे.




२०२२-२३ सालात बेड अँड बाथ, मॅट्रेसेस, शोभिवंत वस्तू, फर्निशिंग फॅब्रिक्स, ब्लाइंड्स, वॉलपेपर्स, गालिचे (कार्पेट्स), हस्तकलेच्या वस्तू, शोभेच्या अक्सेसरीज, हाउसवेअर, स्टोअरेज, स्वयंपाकाच्या वस्तू, स्वयंपाकघरात लागणाऱ्या वस्तू, स्वयंपाकघरातील उपकरणे, टेबलवेअर तसेच गृहोपयोगी उत्पादनांमधील अनेक नवोन्मेषकारी प्रकार तसेच नवीन डिझाइन्स या प्रदर्शनात बघायला मिळतील.

भारतात होम ट्रेडसाठी जुलै हा खरेदीचा (सोर्सिंग) प्रमुख हंगाम असतो. म्हणूनच, व्यापाऱ्यांना आगामी दिवाळी तसेच सणासुदीच्या रिटेल हंगामाच्या दृष्टीने मालाच्या खरेदीची योजना करण्यासाठी १२-१५ जुलै ही योग्य वेळ आहे.

# बेड अँड बाथ: अनेक नवीन पर्याय

बेड अँड बाथ हा भारतातील होम टेक्स्टाइल्सच्या विक्रीतील सर्वांत मोठा विभाग ( कॅटेगरी) आहे. भारतात होम टेक्स्टाइल्स अर्थात गृहोपयोगी वस्त्रांमध्ये ५० टक्क्यांहून अधिक विक्री बेडशीट्सची होते. त्यामुळे बेडशीट्स हे उत्पादन रिटेल विक्रेते व वितरक यांच्यासाठी सर्वांत महत्त्वपूर्ण आहे. रोचक बाब म्हणजे, देशातील दरडोई उपभोगाचे प्रमाण अद्याप कमी असल्यामुळे बेडशीट्सची बाजारपेठ दरवर्षी १२-१५ टक्क्यांनीच वाढत आहे. याचा अर्थ बेड अँड बाथ विभागात उत्पादक, वितरक व रिटेल विक्रेत्यांसाठी अद्याप न उपयोगात आलेली वाढीची संभाव्यता बरीच अधिक आहे.

आश्चर्यकारक बाब म्हणजे अशी संभाव्यता असूनही, भारतीय बाजारपेठेत राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त असे केवळ हाताच्या बोटावर मोजण्याजोगे बेड अँड बाथ ब्रॅण्ड्स अस्तित्वात आहेत. ही संधी लक्षात घेऊन, अमेरिका व युरोपसारख्या जागतिक बाजारपेठांमध्ये सुस्थापित असलेल्या अनेक दर्जेदार उत्पादक व निर्यातदारांनी, एचजीएच इंडिया २०२२च्या माध्यमातून, आपल्या अव्वल दर्जाच्या बेड अँड बाथ ब्रॅण्ड्ससह भारतीय देशांतर्गत बाजारपेठेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.



*Bianca*



*Eurospa*



*Pano*

इंडो काउंट इंडस्ट्रीज लिमिटेड ही भारतातील उंची बेडशीट्सची सर्वांत मोठी निर्यातदार कंपनी, आपल्या बुटिक लिव्हिंग आणि लेयर्स या ब्रॅण्ड्सच्या माध्यमातून काही काळापासून या प्रदर्शनात सहभागी होत आहे. ही कंपनी या हंगामासाठी तयार केलेली त्यांची नवीन कलेक्शन्स लाँच करणार आहे. अव्वल दर्जाच्या युरोपीयन बेड अँड बाथ उत्पादनांच्या आयातीसाठी तसेच अपमार्केट फर्निशिंग व मोठ्या प्रमाणावरील रिटेलिंगसाठी प्रसिद्ध असलेली स्प्रेड होम ही कंपनी, स्प्रेड होम, ईस्पिरिट, टॉम टेलर, पीएर कार्डिन आणि अन्य ब्रॅण्ड्ससह, आपली नवीन कलेक्शन्स सर्वांपुढे आणणार आहे. त्यांच्या नियमित श्रेणीशिवाय, बेड लिनन, मॅट्रेसेस व मेड-अप्सच्या क्षत्रोतील वेगाने वाढत असलेली कंपनी बियांका आपल्या नाउटिका बेडशीट्सची मान्यताप्राप्त श्रेणी बाजारात आणणार आहे. वॉल्ट डिस्ने, छोटा भीम यांच्या व्यक्तिरेखा वापरण्याचा परवाना घेतलेल्या बेड अँड बाथ उत्पादनांची, निवडीला

# होम टेक्स्टाइल्स, होम डेकोर, हाउसवेअर आणि भेटवस्तूंचा आढावा घेता येणार

चिकार वाव असलेली, डिझायनर श्रेणी सस्सून ही कंपनी ठेवणार आहे. उच्च दर्जाच्या बेडशीट्स तसेच बेड लिनन यांचे उत्पादन करणारी जयपूरची बेला कॅसा ही सुस्थापित कंपनी आपली नवीन कलेक्शन्स या प्रदर्शनाच्या माध्यमातून सर्वांपुढे आणणार आहे. या प्रदर्शनात प्लुची, बेला कॅसा आदी अनेक ब्रॅण्ड्सच्या बेबी बेड, बेडशीट्स, ब्लँकेट्स, स्लीप प्रोडक्ट्स, टॉवेल्स आदी उत्पादनांची मोठी श्रेणी बघायला मिळणार आहे.

कोइंबतूरच्या दोन आघाडीच्या बेडशीट निर्यातदार कंपन्या प्रीमियर फाइन लिनन व के. जी. लिनन, एचजीएच इंडियाच्या या आवृत्तीमध्ये, सहभागी होणार आहेत. गाझियाबादमधील प्रस्थापित प्रोसेस हाउसेसपैकी एक असलेली देवतारा इंडस्ट्रीज ही कंपनी आपल्या शायन या ब्रॅण्डच्या माध्यमातून पुन्हा एकदा या प्रदर्शनात सहभागी होणार आहे, तर अहमदाबादची जिंदाल टेक्सोफॅब ही कंपनीही पुन्हा एकदा आपल्या प्रिंटेड बेडशीट्सची श्रेणी प्रदर्शनात मांडणार आहे. कोइंबतूर कॉटन कन्सेप्ट्स ही कंपनी आपल्या डॉक्टर टॉवेल्स या ब्रॅण्डखाली टेरी टॉवेल्सची नवीन श्रेणी सर्वांपुढे आणणार आहे. मदुराईचा पॅरामाउंट टेक्स्टाइल्स, दिल्लीचा मौरिया उद्योग, सुरतचा भगवती टेक्स्टाइल्स, सालेमचा पीव्ही सिल्क असे भारतभरातील ब्रॅण्ड्स त्यांची उत्पादने प्रदर्शनात ठेवणार आहेत.

पानीपतची आघाडीची निर्यात कंपनी पान ओव्हरसीज आपल्या पानो आणि टेक्स स्टाइस्ल या ब्रॅण्ड्सच्या तसेच व्हेरिझा या ब्रॅण्डच्या माध्यमातून बेड कव्हर्स, बाथमॅट्स आणि शोभिवंत दर्जेदार बेड लिनन सर्वांपुढे आणणार आहेत. याशिवाय हातमाग व यंत्रमाग क्षेत्रातील अनेक व्यवसाय आपल्या सर्जनशील होम टेक्स्टाइल्सची उत्पादने प्रदर्शनात ठेवणार आहेत. त्यामुळे येथे खरेदी रोचक ठरणार आहे.

अशा रितीने, एचजीएच इंडिया २०२२च्या दालन क्रमांक १४ व १५ मध्ये बेड अँड बाथ प्रवर्गांमध्ये सोर्सिंग सोल्युशन्स व नवोन्मेषकारी उत्पादनांची मोठी श्रेणी उपलब्ध होणार आहे.

### स्प्रेड होमची आंतरराष्ट्रीय शैली

एचजीएच इंडिया २०२२ मधील स्प्रेड होम उत्पादनांद्वारे बेड, बाथ, होम डेकोर, अक्सेसरीज, बाथ अक्सेसरीजची मोठी मालिकाच सर्वांपुढे येणार आहे. हार्ड गुड्स अर्थात स्टील, लाकूड, बांबू यांसारख्या हलवण्यास सुलभ अशा फर्निचर साहित्यापासून तयार झालेली बटलर ट्रे, बार कॅबिनेट, स्टोअरेज कॅबिनेट आदी उत्पादने यात बघायला मिळणार आहेत.

कंपनीन जागतिक स्तरावरील फॅशन भारतात आणत असून, तिचा भर उच्चभ्रू ग्राहकवर्गावर आहे. स्प्रेड, ईस्पिरिट, टॉम टेलर, पिएर कार्डिन व स्पिरेला या आंतरराष्ट्रीय ब्रॅण्ड्सच्या माध्यमातून भारतात विलासी उत्पादने उपलब्ध करून दिली जात आहेत.



समन्वयात्मक उत्पादन संच अर्थात को- ऑर्डिनेटेड प्रोडक्ट सेट्समध्ये बेड शीट्स, खोलीतील पडदे व खोली सजवण्याच्या वस्तू आहेत. इटालियन व इजिप्शियन कॉटनमधील ७००-१००० थ्रेड काउंटपासून तयार केलेल्या आरामदायी बेड लिननचा यात समावेश होतो. सफाईदार थ्रेड्ससाठी तंत्रज्ञानाचा वापर उपयुक्त ठरतो. प्योर लग्झरी, ड्युरॅबिलिटी प्लाण्ट या ब्रॅण्ड्सच्या बांबू, बोटॅनिक कॉटनपासून तयार केलेल्या बेडशीट्स यात आहेत. या बेडशीट्स आरामदायी, मुलायम तसेच त्वचेसाठी उत्तम आहेत.

### नवोन्मेषाच्या अग्रभागी इंडो काउंट

इंडो काउंट इंडस्ट्रीजचे बुटिक लिव्हिंग आणि लेयर्स हे वेगाने वाढणारे ब्रॅण्ड्स आपल्या दर्जेदार बेडशीट्स व अव्वल बेड लिननच्या नवीन कलेक्शन्समधील अनेक नवोन्मेषकारी सुविधांची ओळख सर्वांना करू देणार आहेत.



**कल्पवृक्ष**

कल्पवृक्ष या कलेक्शनमध्ये बांबू व सुताच्या (कॉटन) मिश्रणातून तयार करण्यात आलेल्या बेडशीट्स आहेत. बांबूची शोषणक्षमता अगदी उत्तम दर्जाच्या सेंद्रीय सुताच्या शोषणक्षमतेहूनही ४० टक्के अधिक असते, त्यामुळे ही बेडशीट वापरणाऱ्याच्या त्वचेवरील आर्द्रता अधिक वेगाने शोषली जाते आणि वापरणाऱ्याला कोरडे व आरामदायी वाटते. सुताप्रमाणेच बांबूचे तंतूही नैसर्गिकरित्या हवा खेळती ठेवणारे व उच्च शोषणक्षम असतात. वजनाला हे बेडशीट अत्यंत हलके असते आणि त्याचा स्पर्श मुलायम असतो, त्यावर नैसर्गिक चमक असते. या कापडाला कोणताही गंध नसतो, ते घाम शोषून घेते आणि प्रभावी यूव्ही संरक्षण देते. या कापडामध्ये जीवाणूरोधक व सूक्ष्मजीवरोधक गुणधर्म अंगभूत असतात. त्यामुळे बिछान्यासाठी (बेडिंग) हा उत्तम पर्याय आहे. बांबू व कॉटनपासून तयार झालेल्या बेडशीट्सचे अनेक लाभ बघता, त्या कल्पवृक्षाहून कुठेच कमी नाहीत.

कल्पवृक्ष बेड सेट्स, ड्युवेट कव्हर्स ३०० टीसी (थ्रेड काउंट) कॉटन व बांबू मिश्रणाद्वारे तयार करण्यात आल्या आहेत. या उत्पादनांमध्ये टॉवेल्सचाही समावेश आहे.

**हेरिटेज वॉक**

भारतातील हस्तकला, तिचा समृद्ध इतिहास व वारसा, हस्तकलेशी वर्षानुवर्षे जोडलेल्या गेलेल्या संस्कृती व त्यांतून मिळणारी प्रेरणा हे सर्व साजरे करण्यासाठी हेरिटेज वॉक कलेक्शन लाँच केले जात आहे. आपल्या संस्कृतीत आढळणाऱ्या वैविध्यपूर्ण वस्त्रांच्या विभागांना हेरिटेज वॉकद्वारे भेट दिली जाणार आहे. वैविध्याने नटलेल्या भारतातील लोक व त्यांचे सण किती विविधरंगी आहेत याचे प्रतिबिंब हेरिटेज वॉकमध्ये दिसते. तुमची मुळे जाणून घेण्यासाठी हा हेरिटेज वॉक घ्या, असे या कलेक्शनच्या डिझायनरचे म्हणणे आहे.

या श्रेणीतील बेडशीट संच प्रिंटेड खादीचे आहेत आणि सोबत डिजिटल पद्धतीने प्रिंट केलेले उशीचे अभ्रे (पिलो कव्हर्स) आहेत.

### कश्मिरी कॉपर आणि ब्रासवेअर

सांगण्याचा मुद्दा- कश्मिरी तांब्याची व ब्रासची भांडी ही उत्तर भारतातील दखल घेण्याजोग्या हस्तकलांपैकी एक आहे. 'तांबे किंवा ब्रासच्या वस्तू तयार करण्याच्या प्रक्रियेत अनेक कारागिरांचा सहभाग असतो. यातील प्रत्येक कारागीर विशिष्ट तंत्रात कुशल असतो. या प्रक्रियेत खार म्हणजेच लोहार, नकाश म्हणजेच कोरीवकाम करणारा, जरकोद म्हणजे लेपन करणारा, रोशनगार म्हणजेच पॉलिश करणारा आणि चरकगार म्हणजेच अखेरचा सफाईदार हात फिरवणारा या कारागिरांचा सहभाग असतो.' यासारख्या सुंदर व सुक्ष्म हस्तकलेवर आणखी प्रकाश टाकण्याची गरज आहे.

### कोइंबतूर कॉटन कन्सेप्ट्स

कोइंबतूर कॉटन कन्सेप्ट्स ही २००३ मध्ये सुरू झालेली एक जागतिक कंपनी असून, घराच्या सजावटीसाठी लागणाऱ्या कापडाचे डिझाइन, विकास व उत्पादन करते. त्याचबरोबर स्वयंपाकघर तसेच टेबल लिननसाठी टेक्स्टाइल अक्सेसरीजचे उत्पादन करते. शोभिवंत वस्तू, बेडिंग, फ्लोअर सीटिंग व अ‍ॅक्सेसरीजही ही कंपनी तयार करते. एचजीएच इंडिया २०२२ मध्ये त्यांच्या डॉक्टर टॉवेल्स आणि द इंडियन टॉवेल कंपनी या ब्रॅण्ड्सखाली नवीन कलेक्शन्स लाँच केली जाणार आहेत. या कंपनीला सेडेक्स, ओएकोटेक्स, जीओटीएस व एसए एटथाउजंड यांच्या प्रमाणपत्रांसह अधिमान्यता प्राप्त झालेली आहे.



### प्रीमियर लाँच करत आहे फाइन लिनन्स

प्रीमियर हा कोइंबतूरस्थित आघाडीचा बेड लिनन ब्रॅण्ड असून, या कुटुंबाद्वारे चालवल्या जाणाऱ्या स्त्री सक्षमीकरणावर भर देणाऱ्या कंपनीकडे ७५ वर्षांहून अधिक औद्योगिक कौशल्याचा वारसा आहे. सर्व सामाजिक नैतिक बाबींची पूर्तताही कंपनीद्वारे केली जाते. या दंडात्मकरित्या एकात्मिक कंपनीमध्ये सुताच्या कताईपासून ते तयार वस्तूपर्यंत (मेड-अप्स) सर्व काही केले जाते. कंपनीचे जगभरात ६०००हून अधिक सहयोगी आहेत तसेच १५० रिटेल व हॉस्पिटॅलिटी ग्राहक आहेत. प्रीमियर समूहाची वार्षिक विक्री २५० दशलक्ष डॉलर्सहून अधिक जाते.

सॅटिन, परकेल, डॉबी, जॅकार्ड, प्रिंट्स आदी विस्तृत प्रकारांत १४४ टीसी ते १००० टीसी सुतापासून विणलेल्या अत्यंत तलम बेडशीट्सचे उत्पादन करणारी ही कंपनी बहुतांशी निर्यात करते. आपल्या ब्ल्यू दहिला, वेस्ट ब्रूक व प्रीमियर फाइन लिनन्स या ब्रॅण्ड्सखाली ही कंपनी एचजीएच इंडिया २०२२च्या माध्यमातून भारतीय देशांतर्गत बाजारपेठेत पदार्पण करत आहे.



# रग्ज आणि फ्लोअर कव्हरिंग्ज



RKS



Obsessions

ग्राहक आपल्या घरातील जमिनीच्या सौंदर्यीकरणावर अधिकाधिक खर्च करू लागल्यामुळे देशातील बहुतेक होम फर्निशिंग व होम डेकोरमधील रिटेल विक्रेत्यांसाठी रग्ज, गालिचे व कृत्रिम फ्लोअरिंग हे महत्त्वाचे विभाग झाले आहेत. या विभागांवर खर्च करणाऱ्या ग्राहकांच्या संख्येत वर्षागणिक २० टक्क्यांनी वाढ होत आहे. बाजारपेठेच्या लग्झरी तसेच प्रीमियम भागातही, पारंपरिक गाठी बांधून तयार केलेल्या जाजमांना (रग्ज) अद्याप मागणी आहे. त्याचबरोबर यंत्राच्या सहाय्याने गाठी मारुन तयार केलेली जाजमे व यंत्राद्वारे तयार केलेले गालिचे या तुलनेने स्वस्त उत्पादनांच्या मागणीतही जलद गतीने वाढ होत आहे.

कालीन आणि आरकेएस यांसारखे ब्रॅण्ड्स, त्यांच्या लोकर, रेशीम व रेयॉनपासून हाताने गाठी मारुन किंवा टफ्टद्वारे गाठी मारुन (हॅण्ड-टफ्टेड) तयार केलेल्या रग्जची नवीन श्रेणी सर्वांपुढे आणणार आहेत. सरल होम त्यांच्या यंत्राद्वारे तयार केलेल्या कृत्रिम रग्ज व लहान मुलांच्या कार्पेट्सच्या कलेक्शनचे तसेच त्यांच्या इझी लिव्हिंग या ब्रॅण्डखालील परवानाप्राप्त व्यक्तिरेखांच्या नवोन्मेषकारी श्रेणीचे अनावरण करणार आहे.

पानिपतची पान ओव्हरसीज ही कंपनी पानो या त्यांच्या ब्रॅण्डखाली, रग्ज, दरी (सतरंजी) आणि बाथ मॅट्सची भारतातील कारखान्यांमध्ये तयार झालेली पण अमेरिकी व युरोपीय बाजारपेठांतील डिझाइन्सपासून प्रेरणा घेऊन डिझाइन केलेली अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय श्रेणी, प्रदर्शनात ठेवणार आहे.

ऑब्सेशन्स त्यांच्या अत्यंत नवोन्मेषकारी अशा आयात केलेल्या, यंत्राद्वारे तयार केलेल्या कार्पेट्स, बाथमॅट्स व डोअरमॅट्सची श्रेणी प्रदर्शनात ठेवणार आहे. ही उत्पादने विविध वर्गांतील ग्राहकांच्या अभिरूचीला साजेशा विविध साहित्यांपासून तयार करण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे स्टुडिओ एचएफही आपल्या फ्लोरिस्टा या ब्रॅण्डखाली आयात केलेल्या रग्जची श्रेणी प्रदर्शनात ठेवणार आहे.

फ्लोअरिंग इंडिया, शाम्शी एक्स्पोर्ट्स आणि अनेक स्थानिक उत्पादक, रिटेलर्सच्या उत्पादनश्रेणीला पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने, वैविध्यपूर्ण उत्पादने देऊ करणार आहेत.

इनडोअर कृत्रिम फ्लोअरिंग, पीव्हीसी फ्लोअरिंग, फ्लोअर टाइल्स, आउटडोअर व कृत्रिम गवत तसेच विविध जीवनशैलींसाठी उपयुक्त कार्यात्मक फ्लोअर कव्हरिंग्ज आदी विभागांमध्ये एव्हरग्रीन बँबू, क्रिस्टल कॉर्पोरेशन, आवाना ग्रीन्स, पोलिनेशन्स, डायरेक्ट डेकोर, अॅझ कॉर्पोरेशन आणि तुलसियानी इंटरनॅशनल आदी अनेक आयातदार कंपन्या, दर्जा व किंमत या दोन्ही दृष्टींनी चपखल सोल्युशन्स व खरेदीचे (सोर्सिंग) विस्तृत पर्याय, देऊ करणार आहेत.

# होम फर्निचर

एचजीएच इंडिया २०२२ मध्ये प्रथमच समाविष्ट करण्यात आलेला इनडोअर व आउटडोअर होम फर्निचरचा विभाग, बहुतांश रिटेल विक्रेत्यांसाठी, अत्यंत रोचक ठरणार आहे. सध्या फर्निचरचा व्यापार करणारे रिटेल विक्रेते असोत किंवा फर्निशिंग फॅब्रिक्स, होम टेक्स्टाइल्स, होम डेकोर किंवा संपूर्ण होम सोल्युशन्सवर लक्ष केंद्रित करणारे व्यापारी असोत, त्यांच्यासाठी हा विभाग आकर्षणाचा विषय ठरणार आहे. कारण, आता अधिकाधिक ग्राहक त्यांच्याकडे शोभिवंत व कार्यात्मक फर्निचरची मागणी करू लागले आहेत. त्यामुळेच गृहोपयोगी उत्पादनांचे रिटेल विक्रेते आता त्यांच्याकडील मालामध्ये फर्निचरचा समावेश करू लागले आहेत. याशिवाय एचजीएचला भेट देणारे आर्किटेक्ट्स व अंतर्गत सजावटकारही फर्निचर, भिंत व जमिनीची सजावट, शोभिवंत वस्तू व सॉफ्ट फर्निशिंग्ज यांमधील समन्वयात्मक सोल्युशन्सची अपेक्षा ठेवू शकतील, कारण, या सगळ्या विभागांतील उत्पादने आता शोमध्ये उपलब्ध आहेत.

वीव्ह क्राफ्ट, सुप्रीम इंडस्ट्रीज, स्प्रेड होम, क्रिस्टल फर्निटेक, नोलाराम यांसारखे ब्रॅण्ड प्रथमच आउटडोअर व इनडोअर फर्निचरची विस्तृत श्रेणी सर्वांपुढे आणणार आहेत.

सुप्रीम इंडस्ट्रीज लिमिटेड ही भारतातील आघाडीची प्लास्टिक मोल्डिंग कंपनी, दैनंदिन वापरासाठी श्रेष्ठ दर्जाच्या आधुनिक डिझायनर प्लास्टिक फर्निचरच्या श्रेणीचे अनावरण करणार आहे. या श्रेणीत खुर्च्या, टेबले, डायनिंग टेबले, स्टोअरेज कॅबिनेट्स व लहान मुलांचे फर्निचर मोल्डेड, अपहोल्स्ट्री ( कापडाचे आच्छादन) केलेल्या तसेच लेपन केलेल्या स्वरूपात उपलब्ध आहे. वीव्ह क्राफ्ट ही कंपनी आउटडोअर पॅटिओ छत्र्या, रोप्स (दोऱ्या) व स्ट्रॅप्सचे कलेक्शन, लाकडी व विणलेले वेताचे फर्निचर, मागे घेण्याजोगी (रिट्रॅक्टेबल) छते, कृत्रिम विणलेले फर्निचर आणि गॅझिबो यांची श्रेणी सर्वांपुढे आणणार आहे.

नागपूरमधील क्रिस्ट्ल फर्निचर ही कंपनी, लाकडापासून तयार केलेली कॉफी टेबल्स, नेस्टिंग टेबल्स, सोफा सेट्स, बेडरूम फर्निचर, मोड्युलर किचन्स, डायनिंग सेट्स तसेच छोटे फर्निचर, लॉंच करणार आहे. राजस्थानातील चुरू येथील नोलाराम ही कंपनी बेड्स, कन्सोल्स, कॅबिनेट्स, डायनिंग, नेस्टिंग टेबल्स, लाउंज चेअर्स आणि अशा अनेक प्रकारच्या पूर्णपणे लाकडी होम फर्निचरची संपूर्ण श्रेणी प्रदर्शनात मांडणार आहे.

याशिवाय, फर्निशिंगमधील रिटेल विक्रेत्यांकडून अधिकाधिक मागणी होणारे छोटे फर्निचर, लहान मुलांचे फर्निचर व घरातील उपयोगी वस्तूंचाही प्रदर्शनात समावेश असेल.



Crystal Furnitech

# होम डेकोर: कालानुरूप बदल

होम डेकोर एक विभाग म्हणजे अनेक शतकांपासून अस्तित्वात आहे, पण त्यामध्ये सुमारे दर १० वर्षांनी मोठे बदल होतात. जीवनशैलीतील बदलांमुळे तसेच सांस्कृतिक व तंत्रज्ञानात्मक बदलांमुळे होम डेकोरमध्येही बदल होतात. एखाद्याच्या घराची सजावट वर्तमान अभिरुचीनुसार करणे हे बहुतेक ग्राहकांपुढील आव्हान असते आणि ते हे आव्हान आनंदाने स्वीकारतात. गेल्या काही वर्षांत राहणे, काम करणे, लोकांशी भेटीगाठी यांसाठी घरात अधिक वेळ घालवला जाऊ लागल्यामुळे, लोक होम डेकोर अर्थात गृह सजावटीच्या कल्पनांमध्ये सातत्याने नावीन्य आणत आहेत. मग ती भिंतींची सजावट असो, जमिनीची सजावट असो, छताची सजावट असो किंवा टेबलाची सजावट असो.

आपले घर सौंदर्याच्या दृष्टीने अधिक प्रसन्न दिसावे आणि त्याच वेळी कार्यात्मकदृष्ट्या अधिक कार्यक्षम असावे यासाठी विविध उत्पादने खरेदी करणे हा ग्राहकांचा छंद झाला आहे यात नवल काहीच नाही. घराचे स्वरूप आणि घरातील अनुभव अधिक चांगला करण्यासाठी आजवर कधी केला जात नव्हता एवढा पैसा खर्च केला जाऊ लागला आहे. त्यामुळे रिटेल विक्रेते, उत्पादक, ब्रॅण्ड्स व आयातदारांसाठी होम डेकोर विभागात स्पष्टपणे नवीन संधी निर्माण झाली आहे. एचजीएच इंडिया २०२२ मध्ये प्रदर्शकांकडून दिल्या जाणाऱ्या उत्पादनांच्या स्वरूपात हा सामाजिक बदल दिसून येणार आहे.



F&F | Excel Wallcoverings

आयात केलेल्या वॉलपेपर्सपासून ते नैसर्गिक व कृत्रिम रग्ज व फ्लोअर कव्हरिंग्जपर्यंत, हस्तकलेच्या वस्तूंपासून ते आधुनिक शोभिवंत अक्सेसरीजपर्यंत, कलात्मक वस्तूंपासून ते मूर्ती, अरोमा, मेणबत्त्या आणि सुवासांपर्यंत, टेबल सजवण्याच्या वस्तूंपासून ते शोभिवंत दिव्यांपर्यंत... उत्पादनांना अंत नाही.

प्रदर्शनाला भेट देणाऱ्यांना मुरादाबाद, फिरोझाबाद, सहारणपूर, खुर्जा, जयपूर, जोधपूर, आग्रा, दिल्ली, रांची, राजकोट आणि भारतभरातील अन्य अनेक उत्पादन केंद्रांतील उत्पादनांची विस्तृत श्रेणी येथे बघायला मिळेल. याशिवाय अनेक उत्पादक व आयातदार भारत, चीन, युरोप, जपान, थायलंड, व्हिएटनाम व अन्य अनेक देशांतील आधुनिक शोभिवंत उत्पादने व साहित्य प्रदर्शनात ठेवणार आहेत. उदाहरणार्थ, एक्सेल होम डेकोर वॉलपेपर्समधील नावीन्यपूर्ण उत्पादने सर्वांपुढे आणणार आहे.

### देशाज बाय एक्सेल वॉलपेपर्स

कोलकात्यात मुख्यालय असलेला एक्सेल होम डेकोर हा वॉलपेपर्सचा आघाडीचा ब्रॅण्ड व आयातदार एचजीएच इंडियामध्ये देशाज वॉलपेपर्सचे नवीन आकर्षक कलेक्शन लॉंच करणार आहे.

देशाज ही स्थानिक भारताची आणि येथील परंपरा, कला, रंग व सौंदर्यशास्त्राच्या स्वरूपातील भव्य कालातीत देखणेपणाची कथा आहे. भारतीय कलाप्रकारांच्या उत्कृष्ट अभिजाततेमध्ये विविध कथाकहाण्यांचे वर्णन केलेले आहे. भारतातील ठळक व सौम्य रंगांचा समतोल साधत भिंतींचा कॅनव्हास उपयोगात आणून स्थानिक भारताच्या कथा सांगण्याचा प्रयत्न या कलेक्शनमधील डिझाइन्सच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

देशाज कलेक्शन हे कालातीत कलमकारी वस्त्रांवरील कथांपासून प्रेरित असून, फुलांच्या नक्षीच्या मछलीपट्टणम शैलीवर या कलेक्शनचा भर आहे. कलमकारी हा पारंपरिक व कालातीत असा भारतीय कलाप्रकार असून, त्याचा शब्दश: अर्थ 'कलम अर्थात पेनने केलेली कलाकुसर' असा होतो.

### निसर्गाचे राग- निसर्गातील संगीतापासून प्रेरित वॉलपेपर्स

टॉइल इंडिएन हा एक पुरस्कारप्राप्त डिझाइन स्टुडिओ आहे. त्यांची कलेक्शन्स लंडन, पॅरिस, टोकयो व टोरोंटो येथील भपकेबाज अंतर्गत रचनेत बघायला मिळतात. एक्सेल टॉइल इंडिएनचे नवीन वॉलपेपर कलेक्शन लॉंच करणार आहे. हे कलेक्शन निसर्गातील संगीतापासून, संगीतातील रागांपासून प्रेरित आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील रागांच्या वृत्ती व भावना टिपणारे रंग यांत वापरण्यात आले आहेत. नेचर्स रागाज कलेक्शन कला, स्थापत्य, वस्त्र व अलंकार यांवरही आधारित आहे. दक्षिण भारतातील मंदिरांतील अलंकार, राजस्थानी व तंजावर चित्रे, मुघल स्थापत्य आणि आर्ट नोवा अर्थात आधुनिक कला यांचा उपयोग करून समृद्ध व दीर्घकाळ स्मरणात राहणारी तसेच आनंददायी रसांना उत्तेजित करणारी डिझाइन्स तयार करण्यात आली आहेत.

# भारतात उत्क्रांत झालेले हाउसवेअर

भारतीय अर्थव्यवस्था पुढील काही वर्षांत वार्षिक ८ ते १० टक्के दरांना वाढेल असा अंदाज आहे. देशाची लोकसंख्या १.३५ अब्ज आहे आणि त्यातील ६५ टक्के ३० वर्षांखालील आहेत. तरुण भारतीय सुशिक्षित, बऱ्यापैकी प्रवास केलेले आणि आंतरराष्ट्रीय जीवनशैली अंगिकारण्यास उत्सुक आहेत. यामुळेच भारतीय व जागतिक कंपन्यांसाठी भारत ही उच्च संभाव्यता असलेली बाजारपेठ आहे. म्हणूनच अनेक आघाडीचे भारतीय आयातदार आणि मोठे औद्योगिक समूह भारतातील देशांतर्गत बाजारपेठेकडे आजवर बघितले नाही एवढ्या गांभीर्याने बघू लागले आहेत.

घराशी निगडित बहुतेक विभागांमध्ये ( होम कॅटेगरी) १५ ते २० टक्के वाढ दिसून येत आहे. अधिकाधिक ब्रॅण्ड्स, उत्पादक व रिटेल विक्रेते आपल्या गृहोपयोगी उत्पादनांचे डिझायनिंग, उत्पादन व मार्केटिंग यांत गुंतवणूक करू लागले आहेत आणि आपल्या रिटेल व वितरण नेटवर्कचा विस्तारही करत आहेत.

हायब्रिड वर्किंग हा आता दीर्घकाळ टिकणारा प्रवाह ठरेल असे समजले जात आहे. त्यामुळे घर हे ठिकाण आता अधिक व्यग्र झाले आहे. तसेच काम व सामाजिक संबंध हे दोन्ही हायब्रिड किंवा संमिश्र पद्धतीने सुरू असल्यामुळे घर हे आरामदायी व सुरक्षित ठिकाण झाले आहे. ग्राहक आता जास्तीतजास्त वेळ घरांमध्ये घालवत असल्यामुळे, ते वारंवार घराकडे बारकाईने



Clay Craft

बघतील आणि त्यांना आपले स्वयंपाकघर, लिव्हिंगरूम तसेच बेडरूमच्या वातावरणात बदल करणे आवश्यक वाटेल हे साहजिकच आहे. म्हणूनच पुढील काही वर्षांत होम कॅटेगरीमधील रिटेल विक्रेते उत्तम कामगिरी करणार हे निश्चित आहे. होम ऑफिस फर्निचर, ॲक्सेंट फर्निचर आणि शोभिवंत ॲक्सेसरी असे नवीन विभाग होम टेक्स्टाइल, फर्निशिंग आणि होम डेकोर या विभागांशी रिटेल विक्रीच्या स्तरावर जोडले जाणार आहेत.

आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, सोय व वेळेत बचत यांसाठी स्वयंपाकघरातील आधुनिक उत्पादने, साधने, कूकवेअर तसेच स्वयंपाकघरातील उपकरणांवर खर्च करण्यास भारतीय ग्राहक आता तयार आहे. स्टीमर, राइस कुकर, सॅण्डविच मेकर, स्लो ज्युसर, फूड प्रोसेसर, वॉटर व एअर प्युरिफायर, व्हेजिटेबल अँड फ्रुट क्लीनर यांसारख्या उत्पादनांना विशेषत्वाने मागणी आहे.

पार्टी तसेच सामाजिक भेटीगाठींसाठी घर हेच केंद्र झाल्यामुळे टेबलवेअर हा एक विभाग म्हणून उत्क्रांत झाला आहे. होरेका अर्थात खाद्यपदार्थांच्या व्यवसायाकडून असलेली मागणी गेल्या दोन वर्षांत फारशी वाढ दाखवत नसली, तरीही अव्वल दर्जाचे डिनरवेअर, ग्लासवेअर, क्रोकरी, कटलरी, सर्व्हेवेअर, टेबल लिनन यांची मागणी ग्राहक व रिटेल क्षेत्रांत २५ टक्क्यांहून अधिक वाढली आहे.

छोट्या शहरांमधील व्यवसाय ऑनलाइन व ऑफलाइन अशा दोन्ही मार्गांनी वाढत आहे. आता श्रेणी २ व ३ शहरांमधील ग्राहकांनाही शहरी जीवनशैली अंगिकारण्याची इच्छा आहे आणि अधिक चांगल्या पद्धतीने डिझाइन केलेली, अधिक दर्जेदार व ब्रॅण्डेड उत्पादन वापरण्यास ते तयार आहेत.

### रत्ना होम प्रोडक्ट्स

रत्ना होम प्रोडक्ट्स ही कंपनी, सुकामेवा, मसाले व स्वयंपाकघरातील अन्य वस्तूंसाठीच्या स्टोअरेज बॉक्सेसचे नवीन कलेक्शन एचजीएच इंडिया २०२२ मध्ये लॉंच करणार आहे. यात चौरस, आयत व पंचकोन अशा भौमितिक आकारांतील बॉक्सेसचा समावेश आहे. हा ब्रॅण्ड लहान मुलांसाठी आकर्षक डिझाइन्समधील प्लेट्स (ताटल्या) प्रदर्शनात ठेवणार आहे. लहान मुले आनंदाने जेवतील अशा या प्लेट्स आहेत.

रत्नाचे बीपीए प्लास्टिकमुक्त चषकाच्या आकाराचे स्टेनलेस स्टीलचे बहुपयोगी कटलरी होल्डरही आहे.

### स्टॅह्ल

स्टॅह्लने डिझाइन केलेला व्हर्सािटल प्रेशर कूकर हे प्रेशर कुकिंगच्या संकल्पनेचे भविष्यकाळातील स्वरूप आहे. याचे क्लॅस्प-ऑन पद्धतीचे झाकण वापरण्यास सोपे आहे, यात स्वयंपाक करणे सुखद अनुभव आहे आणि ही एक स्वयंपूर्ण स्वयंपाक परिसंस्था ठरू शकते. उत्तम दर्जाच्या ट्रायप्लायपासून तयार करण्यात आलेले हे प्रेशर कुकर वेगाने अन्न शिजवतात, सुरक्षित आहेत आणि देखणेही आहेत.

अभिजात तरीही दणकट असे हे कूकर देखणे व



Sthal

खात्रीशीर आहेत. प्रेशर कूकरचे मूळ स्वरूप व अनुभव वैशिष्ट्यपूर्ण असावे असे वाटणाऱ्या ग्राहकांना व्हर्सािटल कूकर नक्कीच आकर्षित करून घेईल.